Recd on 3/8/06
[signature]

P. E. S. MODERN HIGH SCHOOL
English Medium, Pune-5
INWARD
No. 370 Date 03-08-06
Initials SVK

यशवंतराव चव्हाण भवन,
जिल्हा परिषद, पुणे
[ शिक्षण माध्यमिक ]
जा. क्र. शिक्षण/माध्य/अ-/०५-०६
दिनांक : १६-८-२००५

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
पी. ई. एस. मॉडर्न
हायस्कूल, पुणे-५

विषय :- मान्यता प्राप्त अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित माध्यमिक शाळामधून नैसर्गिक वाढीच्या व अतिरिक्त तुकडया मंजूर करणे बाबत. ......

संदर्भ :- १] शासन निर्णय क्रमांक - मा. शाा. अ-१००३/(३८०/२००३] मा. शि. -१ दिनांक १३ ऑगस्ट २००४.

२] मा. शिक्षण संचालक [ माध्य. व उच्च माध्यमिक ] शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे - १ यांचे क्रमांक अमाशा १००४/ /२००४-०५/जा. तु. मंजूरी/१५-क व दिनांक ०८.०९.२००४ चे पत्र

३] मा. शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे - १ यांचे क्रमांक
दिनांक

चे पत्र.

उपरोक्त विषय व संदर्भानुसार आपणांस कळविण्यात येते की, सन ~~२००- ०२ २००२-०३~~ व २००४-०५ या शैक्षणिक वर्षामध्ये आपण कार्यालयाकडे सादर केलेले जादा तुकडी मागणीचे प्रस्ताव व कार्यालयामार्फत करण्यात आलेली प्रत्यक्षपडताळणी व प्रत्यक्ष कागदपत्रांची केलेली छाननी याचा विचार करुन आपल्या विद्यालयात पुढील प्रमाणे नविन तुकडया त्या समोर दर्शविलेल्या तपशीलप्रमाणे मंजूर करण्यात येणेत आहेत.

| अ. नं. | इयत्ता | तुकडी क्रमांक | कोणत्याही शैक्षणिक वर्षापासून | जादा / नैसर्गिक वाढीव | विनाअनुदानित/ कायम विना अनुदानित |
|---|---|---|---|---|---|
| १. | ५वी | २री | २००४-०५ | जादा | कायम विनाअनुदानित |
| २. | ६वी | २री | -"- | -"- | -"- |
| ३. | ७वी | २री | -"- | -"- | -"- |
| ४. | ८वी | २री | -"- | -"- | -"- |
| ५. | ९वी | २री | -"- | -"- | -"- |
| ६. | १०वी | २री | -"- | -"- | -"- |

उपरोक्त तुकड्या पुढील अटी व शर्तींच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहेत.

१] विनाअनुदान तत्वावर मंजूर करण्यात आलेल्या तुकड्यांना दिनांक १४ जुलै २००० च्या शासन निर्णयातील अनुदान सुत्र किंवा जेव्हा त्या तुकड्या अनुदानास पात्र ठरुन अनुदानावर आणल्या जातील त्यावेळी जे अनुदानाचे सूत्र असेल ते लागू राहील.

२] अशा तुकडीस अनुदानाचा हक्क प्राप्त होणार नाही. निधीच्या उपलब्धतेनुसार निकषपात्र तुकड्यांना शासन अनुदान लागू करीत असते हे अनुदान भूतलक्षी-प्रभावाने लागू केले जाणार नाही. जेव्हा पासून अनुदान सुरु करण्यात येईल त्यावेळी अशा तुकड्यांना ज्या टप्प्यावरील अनुदान देय राहील त्या टप्प्यावरील अनुदान लागू करण्यात येईल, तत्पूर्वीचे कोणतेही अनुदान अनुज्ञेय असणार नाही.

३] नैसर्गिक वाढीव्यतिरिक्त अति - रिक्त तुकड्या या केवळ कायम विनाअनुदान-तत्वावरच मंजूर करण्यात आल्या आहेत. अशा तुकड्या अनुदानास पात्र असणार नाहीत. ४

~~४]~~ कायम विनाअनुदान तत्वावरील शाळेच्या नवीन जादा तुकड्या कायम विना अनुदान तत्वावरच मंजूर करण्यात आल्या आहेत अशा तुकड्या देखील अनुदानास पात्र असणार नाहीत.

जादा मंजूर तुकड्यानुसार सेवकसंच मान्य करुन घेणे व नवीन पदावर नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना वैयक्तिक मान्यता घेणे याबाबत त्वरीत कार्यवाही करुन घ्यावी.

शिक्षणाधिकारी (माध्य.)
पुणे जिल्हा परिषद, पुणे.